## निशाणी क्र. १२६ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. २ प्रकाश सहदेव परब हे दि.०६/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. २ चे मृत्यूला ९० दिवस उलटून गेल्याने तांत्रिक दृष्टया दावा अबेट झाला आहे. वादीचा दावा पुढे चालविणेचे दृष्टीने अबेटमेंट आदेश रद्द करणेत यावा व प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तूत प्रतिवादी क्र. २ हे दि. ०६/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत, असे दिसून येते. प्रस्तूत प्रतिवादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा दावा वाटप व पृथक कब्जाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करणे

न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

**–आदेश –**

१. प्रस्तूतचा वादीचा अर्ज रक्कम रु. १००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.

स्थळ : देवगड
दिनांक: ०३/०१/२०२२

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.01.04 10:48:44 +0530